






**1.वैयक्तिक माहित-**

श्री किरणकुमार रामाजी वांद्रे , गणेश नगर, कामठी, नागपूर, , जन्म तारीख- २८/०९/१९८८

फोन नंबर-99703 04878,  email-krwandhare@gamil.com

**२. कुटुंबाची माहिती -** आई वडील यांचेकडे स्वतःचे 5 एकर शेती आहे. भाऊ हा इंजिनीअर आहे. पत्नी गृहिणी आहेत.

**3.नोकरी माहिती-** हे पदवीधर असून ते BSNL कंपनी मध्ये चंगल्या पदावर कार्यरत होते. पण पाच वर्षानंतर त्यांचे नोकरी मध्ये मन रमत नव्हते, त्यांना काही तरी स्वतःचे शेतीशी निगडित व्यवसाय करावा असे सतत मनात यायचे. मग त्यांनी कंपनी सोडण्याचा धाडसी निर्णय घेतला.

**४.सद्यस्थिती  आणि प्रशिक्षण माहिती**

एके दिवशी असच त्यांनी वर्तमान पत्रामध्ये एका कुकूटपालकाची यशोगाथा वाचली, ते वाचून त्यांची पण हा व्यवसाय करावा अशी इच्छा झाली. मग त्यांना इंटरनेट वर नागपूर पासुवैद्यक महाविद्यालय येथील कुकूटपालन विभागा अंतर्गत आयोजित प्रशिक्षण शिबिराबद्दल वाचले व त्यासाठी नाव नोंदून डॉ  कदम सर व डॉ  गोळे  मॅडमच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेतले. कुक्कुटपालनातील विविध पैलू बद्दल शास्त्रोक्त माहितीचे संकलन केले.

**5. व्यवसाय कधी सुरु केला.-** व्यवसाय सुरु करण्यासाठी त्यांनी वडिलांकडून भांडवल घेतले.त्यानंतर घरच्याच शेतामध्ये गहू हिवरा रोड , कन्हान कांद्री, येथे शेड उभारून 2000 पक्ष्यापासून व्यवसायाची सुरुवात केली. पण बाजार पेठेत विकण्यासाठी खूप त्रास झाला. त्यानंतर त्यांनी बऱ्याच कुक्कुटपालन उद्योजकशी चर्चा केली असता त्यांच्या असे लक्षात आले कि एकात्मिक करार पद्धतीने केलेले कुकूटपालन चांगले राहील, त्यामध्ये बाजारपेठेची कोणतीही चिंता नसते असे समजले. म्हणून त्यांनी सगुणा कंपनी सोबत करारनामा केला व कुक्कुटपालनास नव्याने सुरुवात केली. कंपनी त्यांना पक्षी संगोपणासाठी 6.5 रुपये / किलो याप्रमाणे पैसे द्यायंची. यातील नफा पाहून त्यांनी व्यवसाय वाढवण्याचे ठरवले.

**६ घरातील लोकांची मदत-** भाऊ “भारत’  तसेच पत्नी पलक ह्यांची व्यवसायात मदत  होते.

**६ अडचणी-** त्यांच्या फार्म वर राणीखेत नावाच्या विषाणूजन्य रोगाने थैमान घातलं होत. पण त्यांनी पशुवैद्यकाच्या सहाय्याने योग्य निदान करून अचूक उपचार केला व तोटा पासून बचाव केला.  फार्म वर फ्युमिगेशन आणि जैविकसूरक्षेचा अवलंबून रोगाचा प्रतिबंध उपाय केला.प्रशिक्षण व अनुभवाच्या बळावर ते उत्तम रित्या फार्म चालवतात.

**७ सद्यस्थिती आणि उत्पन्न -** सध्या 12,000 पक्षी क्षमता असलेले शेड फार्मवर आहेत. यातून त्यांना दर वर्षी 7-8 लाख रुपये निवळ नफा मिळतो.

**९ प्रशिक्षणाचा फायदा -**प्रशिक्षणात कोंबड्यांचे व्यवस्थापनातील बारकावे तसेच खाद्य .आजार ,लसीकरण ,जैवसुरक्षा ह्याची सखोल माहिती मिळाली. ह्या  माहितीमुळे योग्य व्यवस्थापन करून कुक्कुटपालन व्यवसाय भरभराटीस नेता येत आहे.

**१० राहणीमानात फरक-** कुक्कुटपालन व्यवसायामुळे आर्थिक अवाक वाढल्यामुळे समाजात निश्चितच मान अधिक मिळत आहे. तसेच आज मितीला कुक्कुटपालन मार्गदर्शनासाठी आमंत्रित केले जाते.

**११. युवकांना सल्ला यशाचे श्रेय-** भविष्यात त्यांचा कुक्कुटपालन व्यवसाय  वाढवायचा आणि सोबत शेळीपालन करण्याचा पण विचार आहे.ते नवीन युवा पिढीला सांगतात कि परिस्थिती कशीही असो, कधी हार मानून माघार घ्यायची नाही.

**१२ मार्गदर्शकाचे नाव**

**१. डॉ. मुकुंद एम. कदम**
सहाय्यक प्राध्यापक, कुक्कुटपालन शास्त्र विभाग, नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर
संपर्क क्र. ८८८८८३६३७४
**२. डॉ मयुरा आ.गोळे.**

सहाय्यक प्राध्यापक, कुक्कुटपालन शास्त्र विभाग, नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर
संपर्क क्र. ९४२१६२६६५७